बहुजन समाज शिक्षण संचलित

# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनगीर ता.जि. धुळे

## युवती सभा अहवाल

२०१४ ते २०१५

Bahujan Samaj Shikshan Prasarak Mandal's Arts Commerce & Science College Established in 1996 Songir T.& D.Dhule

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध प्रकारचे मंडळ कार्यरत असतात. ही मंडळं विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रयत्नशील असतात. व या माध्यमातून सुजाण नागरीक तयार करीत असतात. म्हणून महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना त्यांचा व्यक्तीमत्त्वाचा विकास साधता यावा या भूमिकेतून 'युवती सभा' ही योजना विद्यापीठाने मा. कुलगुरुंच्या मार्गदर्शनाखाली सुरु केली आहे.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न असणारी बहुसंख्य महाविद्यालये ग्रामीण भागात असून त्याठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनी दररोज बसने महाविद्यालयात ये-जा करतात. महिलांवर होणारे अत्याचार, छेडखाणीच्या प्रकारामुळे या मुली भयाच्या वातावरणात वाढतात. त्यामुळे त्यांना मोकळेपणाने सहभागी होता येत नाही. त्यांना सबळ व स्वावलंबी होतायावे म्हणून स्वयंसिद्धा अभियान विद्यापीठाने राबवण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच मैत्री शिबिर, साहस, शिबिर, व्यक्तिमत्त्व विकास व श्रम संस्कार शिबिर अशा प्रकारचे उपक्रम विद्यापीठाकडून राबविले जातात.

Samaj Shikshan Prasarak Mandal's Arts Commerce & Science College Establishadin 1996 Songir

दि.११/८/२०१४ रोजी युवती सभे अंतर्गत महाविद्यालयात सौंदर्यशास्त्र या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी मा. सौ. वंदना शेळके (सौंदर्यतज्ञ, धुळे) यांना आमंत्रित करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या विद्यमान संचालिका ताईसो. सौ. प्रमिलाताई अमृतरावजी कासार उपस्थित होते व अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य मा. आबासो. डॉ. के. बी. पाटील हे होते.

मा. सौ. वंदना शेळके यांनी विद्यार्थिनींना सौंदर्यशास्त्र या विषयावर मार्गदर्शन केले. मुलींनी आपले सौंदर्य खुलविण्यासाठी कुठले ब्युटी प्रॉड्क्टस् वापरावेत, कशाप्रकारची केशरचना करावी, साडी ड्रेपींग इ. विषयांवर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पी. डी. पाटोळे (युवती सभा सदस्य) यांनी केले, स्वागत गीत–कु. कविता वाघ, उर्मिला देसले आदिंनी केले. पाहुण्यांचा परिचय मृगल जाधव हिने केला.

सौ. वंदना शेळके यांचा सत्कार प्रा. पी. डी. पाटोळे यांनी केला. मा. सौ. प्रमिलाताई कासार यांचा सत्कार प्रा. के. यु. सोनवणे यांनी केला. मा. प्राचार्य डॉ. के. बी. पाटील यांचा सत्कार प्रा. एन. एस. सोनवणे यांनी केला. आभार प्रदर्शन प्रा. के.यु. सोनवणे यांनी मानले.

दिनांक २४/०९/२०१४ रोजी युवती सभे अंतर्गत युवती सभेच्या विविध उपक्रमांचे उद्घाटन करण्यात आले.

महिला सक्षमीकरण, आरोग्य जनजागृती, स्त्रीभृण हत्या, लैंगिक अत्याचार, महिलांसाठी हक्क व कायदे, समाजकारण व राजकारण यातील सहभाग, रोजगाराच्या संधी इ. विविध विषयांवर प्रबोधनपर उपक्रम वर्षभरात राबविले जातात. कार्यक्रमाचे उद्घाटक मा.डॉ.योगिता पाटील (झेड. बी. पाटील महाविद्यालय, धुळे), प्रमुख अतिथी म्हणून विद्यमान संचालिका मा. ताईसाहेब प्रमिलाताई अमृतरावजी कासार, कार्यक्रमाचे नियोजित अध्यक्ष म्हणून उपस्थित आपल्या महाविद्यालयाचे प्राचार्य मा. आबासाहेब डॉ. के. बी. पाटील व कला विभागाचे उपप्राचार्य मा. प्रा. ए. बी. पाटील व विज्ञान विभागाचे उपप्राचार्य मा. प्रा. एन.एस. सोनवणे व विद्यार्थी कल्याण अधिकारी मा. प्रा.डी.एस. पाटील व प्रा. डॉ. आर. जी. खैरनार व सर्व प्राध्यापक बंधु-भगिनी व सर्व विद्यार्थिनी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पी. डी. पाटोळे यांनी केले. सूत्र संचलन विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. डी. एस. पाटील यांनी केले. स्वागत गीत मृगल जाधव, कविता वाणी, उर्मिला देसले यांनी सादर केले.

प्रमुख अतिथींचा परिचय युवती सभा समिती सदस्य प्रा. के. यु. सोनवणे यांनी करुन दिला.

संस्थेचे अध्यक्ष मा. भाऊसो. अमृतरावजी कासार यांचा सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य आबासो. डॉ. के. बी. पाटील यांनी केला.

मा. डॉ. सौ. योगिता पाटील यांचा सत्कार प्रा. पी.डी. पाटोळे यांनी केला. प्रमुख अतिथी मा. ताईसो. सौ. प्रमिलाताई यांचा सत्कार सोनवणे मॅडम

Samaj Shikshan Prasarak Mandal's
Commerce & Science College
Establishedin 1996
Songir
T.& D.Dhule

यांनी केला. मा. प्राचार्य आबासो. डॉ. के. बी. पाटील यांचा सत्कार प्रा. डी.एस. पाटील सरांनी केला.

कला विभागाचे उपप्राचार्य प्रा. ए. बी. पाटील व विज्ञान विभागाचे प्राचार्य प्रा. एन. एस. सोनवणे यांचा सत्कार प्रा. डॉ. आर. जी. खैरनार यांनी केला. डॉ. आर. जी. खैरनार व प्रा. डी.एस. पाटील यांचा सत्कार आबासो. डॉ. के. बी. पाटील यांनी केला.

कार्यक्रमात प्रा. डॉ. आर. के. जाधव (धुळे जिल्हा समन्वयक) यांनी मनोगत व्यक्त केले. त्यात ते म्हणाले स्त्रियांचे वेदकाळापासून ते आधुनिक काळापर्यंत जे सामाजिक स्थित्यंतर झाले त्याबद्दल त्यांनी माहिती दिली. स्त्रियांनी स्वत:वर विश्वास ठेवून जर कार्याला सुरुवात केली; तर त्यांना निश्चितच यश प्राप्त होईल असा विश्वास व्यक्त केला.

डॉ. आर. जी. खैरनार यांनी आपल्या मनोगतात 'महिलांचा राजकारणातील सहभाग' या विषयावर विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले.

प्रा. खैरनार यांनी विविध उदाहरणे देऊन महिलाराज कसे चालवावे व आजच्या काळातील ती कशी गरज आहे. महिलांचा राजकीय सहभाग वाढल्यामुळे महिला सामाजिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर आल्यामुळे त्यांचा राजकीय व सामाजिक विकास घडून आला आहे.

प्रमुख पाहुणे मा. डॉ. योगिता पाटील यांनी, आजचा ज्वलंत प्रश्न म्हणजे 'स्त्री भ्रूण हत्या' व 'महिलांचे लैंगिक शोषण' यावर मार्गदर्शन केले.

प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे अध्यक्ष मा. भाऊसो. अमृतरावजी कासार हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. डॉ. आर. जी. खैरनार यांनी केले.

Samaj Shikshan Prasarak Mandal's
Arts, Commerce & Science College
Establishedin 1996
Dhule

दि. ३/११/२०१४ रोजी युवती सभे अंतर्गत मा. प्रा. एस. बी. खैरनार (वनस्पती शास्त्र विभाग) यांनी विद्यार्थिनींसाठी वनऔषधींचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले.

विविध प्रकारच्या वनस्पतींचा औषधी म्हणून कसा उपयोग केला जातो? हे त्यांनी विविध वनस्पतींचे उदाहरणे देऊन विस्तृत केले. उदा. आवळा, बेहडा, हिरडा, तुळस इ. वनस्पतींचा उपयोग आरोग्यवर्धक म्हणून केला जातो. यावर मार्गदर्शन केला.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य आबासो. डॉ. के. बी. पाटील हे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. आर. के. जाधव हे होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पी.डी. पाटोळे यांनी केले. स्वागत गीत- मृगल जाधव व शुंभागी पाटील यांनी म्हटले. पाहुण्यांचा परिचय कविता वाघ हिने करुन दिला. सत्कार समारंभ मा. प्रा. एस. बी. खैरनार यांचा सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य आबासो. डॉ. के. बी. पाटील यांनी केला.

प्राचार्य आबासो. डॉ. के. बी. पाटील यांचा सत्कार प्रा. एन. एस. सोनवणे यांनी केला; तर प्रा. डॉ. आर. के. जाधव (धुळे जिल्हा समन्वयक) यांचा सत्कार प्रा. एन.व्ही. पाटील यांनी केला.

आभारप्रदर्शन प्रा. के. यु. सोनवणे यांनी मानले.

दि. १४/१/२०१५ रोजी रांगोळी व मेहंदी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. परीक्षक म्हणून मा. सौ. स्वातीताई संदीप कासार, मा. सौ. अर्चना तांबटकर व मा. सौ. सुनिता कासार यांनी काम पाहिले.

Bahujan Samaj Shikshan Prasarak Mandal's Arts, Commerce & Science College Establishedin 1996 Songir T.& D.Dhule

Principal
Bahujan Samaj Shikshan Prasarak Mandal's
Arts Commerce & Science College
Songir Tal.& Dist.Dhule


“ युवती सभा

